प्रसनोट दि. २९.०५.२०२०

**मंडल अधिकारी कार्यालय आरग ता. मिरज जि. सांगली येथील मंडल अधिकारी यांचे हाताखाली काम करणारे श्री. आनंदा परशराम पाटील वय ४० वर्ष रा. मंगसुळी रोड, तांदुळवाडी मळा आरग ता. मिरज जि. सांगली यांनी १०,०००/- रूपये लाच मागणी केलेवरून त्यांचे विरूध्द लाच मागणीचा गुन्हा दाखल सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

तक्रारदार यांची संतोषवाडी ता. मिरज जि. सांगली या ठिकाणी शेत जमीन आहे. सदरची शेत जमीनी संदर्भात तक्रारदार व तक्रारदार यांचे मुलाचे विरूध्द असलेला तक्रारी अर्ज निकाली काढण्याकरिता मंडल अधिकारी यांचे हाताखाली काम करणारे खाजगी इसम श्री. आनंदा पाटील यांनी मंडल अधिकारी यांनी १५०००/- रूपये द्यावे लागतील असे सांगीतले आहे असे सांगून तक्रारदार यांचेकडे १५,०००/- रूपये लाचेची मागणी केली असलेबाबत तक्रारदार यांनी दि.१३.०२.२०२० रोजी तक्रारी अर्ज दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १४.०२.२०२० रोजी केले पडताळणीमध्ये श्री. आनंदा पाटील, खाजगी इसम यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानंतर तक्रारदार यांना मंडल अधिकारी यांचेकडे पडताळणी कामी पाठवले असता मंडल अधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली नाही. त्यानंतर श्री. आनंदा पाटील, खाजगी इसम यांनी तक्रारदार यांना संपर्क केला नाही.

श्री. आनंदा परशराम पाटील वय ४० वर्ष रा. मंगसुळी रोड, तांदळवाडी मळा आरग ता. मिरज जि. सांगली यांनी तक्रारदार यांचकडे १०,०००/- रूपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द आज दि. २८.०५.२०२० रोजी मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून श्री. आनंदा परशराम पाटील वय ४० वर्ष रा. मंगसुळी रोड, तांदळवाडी मळा आरग ता. मिरज जि. सांगली यांना सदर गुन्हयाचे कामी अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्रीमती सुषमा चव्हाण सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक व श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कर्मचारी, संजय कलकुटगी, अविनाश सागर, संजय संकपाळ, रविंद्र धुमाळ, राधिका माने, सिमा माने, सारिका साळुंखे - पाटील, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in